This Question Paper contains 7 printed pages.
*(Sections - A, B, C & D)*

Sl.No. 5762

# 03 (M)

**(MARCH, 2020)**

ay
1

*Time : 3 Hours]* *[Maximum Marks : 80*

**सूचना :**

1) हस्ताक्षर स्पष्ट लिहा.
2) या प्रश्नपत्रिकेमध्ये चार विभाग करण्यात आलेले आहेत. A, B, C आणि D व एकूण 1 ते 37 पर्यंत प्रश्न क्रमांक आहेत.
3) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत. प्रश्नांचे विकल्प आंतरिक आहेत.
4) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.
5) आवश्यक तेथे स्वच्छ आकृत्या काढा.
6) नवीन पानावर नवीन विभाग लिहा. प्रश्नांची उत्तरे अनुक्रमे लिहा.

## विभाग – 'A' (गद्य)

1) खालील दिलेल्या योग्य जोड्या जुळवा. **[2]**

| 'अ' विभाग | | 'ब' विभाग |
|---|---|---|
| 1) कपऱ्या | – | मधुसुदन कालेलकर |
| 2) क्रांति कारकांची वज्रमुठ | – | कुमुद पावडे |
| 3) छात्रालयातील आठवणी | – | ऐतिहासिक कथा |
| 4) माझ्या संस्कृतची कथा | – | कादंबरी अंश |

■ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [4]

2) आरमारात कोणकोणत्या प्रकारची लाकडे लागतात?

3) पगार होताच रामुने वैनी जवळ काय मागितले?

4) गाडगेबाबांनी सफाई कार्यात कोणाला सामावून घेतले?

5) बडोदा संस्थानाविषयी 'टाकाऊ' अशी नोंद कोणी केली होती?

■ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : [6]

6) स्वामी गायींना घेऊन निघाले त्यावेळी ब्राह्मणाने कोणकोणत्या सूचना दिल्या?

7) आजोबांनी मुलांना काय करायला सांगितले?

8) नानांनी वानराला कसे विनवले? व लोहार काय बोलला?

किंवा

8) डॉ. दोशींनी मगरबाईना कोणते मार्गदर्शन केले?

■ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. [8]

9) इंदिराबाईंनी मधल्या सुटीतला चहा का सोडला? सविस्तर सांगा?

10) गाडगेबाबांनी स्वच्छता मोहिमेतून कोण कोणत्या गोष्टी साध्य केल्या?

किंवा

10) सावरकरांनी तुरुंगाधिकारी बारीकडून स्वत:साठी कोलूची शिक्षा का मागून घेतली?

## विभाग – 'B' (पद्य)

■ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [4]

11) ज्ञानेश्वरीचे आधीचे नाव काय होते?

12) कवितेतील वर्णन कोणत्या वेळचे आहे?

13) मला काय बोचते आहे. असे कवी म्हणतो?

14) कवीच्या कवितेचा रंग कसा आहे?

■ खालील दिलेल्या कवितेच्या अपूर्ण ओळी पूर्ण करा. [2]

15) जमा खर्च स्वातंत्र्याचा मांडणार केव्हा?

---------------------

---------------------

---------------------

विलायती वेशांमधली भुंकतात कुत्री.

■ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. [6]

16) हिमालयाचे वर्णन कवितेत कसे केले आहे?

17) विलायती वेशांतील लोकांना कशाची उपमा दिली आहे? का?

18) कवी अनिलांनी "श्रावणझड" कवितेत डबक्याचे वर्णन कसे केले आहे?

किंवा

18) बगळ्यांना धोब्याकडे देण्याचा विचार कवीला का सुचला?

■ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. [8]

19) लढाईच्या मैदानात जवान आणि पत्नी यांनी मिळून काय केले आहे?

20) 'श्रावणझड' या कवितेच्या आधारे "श्रावणातल्या पावसाचे" वर्णन करा?

किंवा

20) ज्ञानेश्वरांच्या विराणीमधून भक्ताची मन:स्थिती कशी व्यक्त झाली आहे ते लिहा?

## विभाग - 'C' (व्याकरण)

■ खालील प्रश्नांची सूचने प्रमाणे उत्तरे लिहा.

21) वाक्य रूपांतर करा. [2]

अ) आज गाडीत अतोनात गर्दी - होती

(उद्‌गारार्थी वाक्य करा)

खालील वाक्य होकारार्थी करा.

ब) अपमान केल्यास कुणाला राग येत नाही?

22) खालील समास ओळखा. [1]

अ) चातुर्मास ब) नीलकंठ

23) समानार्थी शब्द लिहा. [1]

अ) विश्रब्ध ब) शिर

24) विरूद्धार्थी शब्द लिहा. [1]

अ) सुधा ब) नास्तिक

25) खालील अलंकाराची उदाहरणे ओळखा. [2]

अ) गडद निळे गडद निळे जलद भरूनि आले.

ब) आभाळागत माया तुझी आम्हांवरी राहु दे.

26) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. [1]

अ) प्रबोधन करणे     ब) टर उडवणे

27) म्हणींचा अर्थ सांगा. [2]

अ) पळसाला पाने तीनच.     ब) शितावरून भाताची परीक्षा.

28) शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा. [2]

अ) सेवा करणे हीच भावना असणारे.     ब) स्वच्छतेसाठी केलेले सतत काम.

29) प्रयोग ओळखा [2]

अ) रावण रामाकडुन मारला जातो.     ब) आज सतत गडगडते.

30) वृत्त ओळखा [2]

अ) पखरण बघ घाली भूवरी पारिजात:

ब) कुठे भटकशी घना? वळुनि ऐक केकावली.

## विभाग – 'D' (अर्थग्रहण / लेखन)

31) खालील पैकी कोणत्याही एका विषयावर कल्पना विस्तार करा. [4]

1) हे विश्वचि माझे घर.

2) मरणात खरोखर जग जगते.

32) निरक्षर लोकांसाठी तुम्ही काय करणार या बाबतचे तुमचे विचार मित्राला पत्र लिहुन कळवा. [4]

(पत्ता 7, राजभवन, शिवाजी चौक अहमदाबाद)

(सूचना : पत्रात तुमचे नाव पत्ता किंवा सहीचा उल्लेख करू नये)

33) तुमच्या शाळेत 'पर्यावरण दिवस निमित्ते' 'वृक्षारोपण' कार्यक्रम साजरा केला त्या विषयी अहवाल लिहा. [4]

34) खालील अपठित गद्य उतारावाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. [4]

यशोदाबाईंच निधन झालं त्यावेळी साने गुरूजी कॉलेजमध्ये गेलेले नव्हते ते मॅट्रिकच्या परीक्षेची तयारी करत होते. यशोदाबाईंनी त्यांना कॉलेजमध्ये जाताना पाहिल नाही. पण भावसाक्षरतेची सर्वोच्च पद्वी साने गुरूजींना मिळेल; याची व्यवस्था त्यांनी आपल्या या मुक्त विद्यापीठाद्वारे करून ठेवली होती 'साने – विचार' हा मला फार महत्वाचा वाटतो. एका आठवड्याच्या आत लिहिलेलं पुस्तक 'श्यामची आई' बेचाळीस आठवडे लिहिलेलं 'सुधास पत्रे' आणि एका रात्रीत लिहिलेलं 'सोन्या मारूती' ही तीन्ही पुस्तकं त्यांच्या विचारांच्या दृष्टीनं फार महत्वांची आहेत. पण सगळ्यात महत्त्वाचे त्यांच पुस्तक म्हणजे 'भारतीय संस्कृती' 1935-36 साली हे लिहिलं गेलं.

प्रश्न :

1) यशोदाबाईंचे निधन झाले तेव्हा साने गुरूजी काय करीत होते?

2) भावसाक्षरतेची सर्वोच्च पद्वी कोणाला मिळाली?

3) एका आठवड्याच्या आत लिहिलेलं पुस्तकाचे नाव काय आहे?

4) 1935-36 साली अत्यंत महत्त्वाचे पुस्तक कोणते होते?

■ खालील दिलेल्या मुद्यावरून कोणत्याही एका विषयांवर सुमारे 200 शब्दांत निबंध लिहा. [8]

35) वृक्ष मानवाचा जिवलग मित्र

(मुद्दे) : संताचे वृक्षारोपणाचे महत्त्व .... तुकाराम महाराजांना तर वृक्ष हे आपले सगेसोयरे वाटतात विकासासाठी माणसाने अविचाराने जंगलतोड केली ....... दुष्काळाचे प्रदुषणाचे संकट ......... हवेतील कार्बनडाय ऑक्साइड शोषून घेतात ..... वृक्ष, अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागवतात ....... औषधीचा वनस्पती माणसाने असाध्य आजारांवर मात केली आहे.

36) शेतकऱ्याचे मनोगत

(मुद्दे) : शेतकऱ्याचे रोजचे जीवन – शेतकऱ्याची सामान्य सुख दुःख ..... नैसर्गिक आपत्तीमुळे येणारी संकट शेतकऱ्याचे प्रश्न ....... शेतीशी निगडीत राजकारण, अर्थकारण, समाजकारण इ. शेतीची खेड्यांची परिस्थिती सुधारावी यासाठी तळमळ.

37) मनोरंजनाची साधने बंद पडली तर

(मुद्दे) : त्यासाठी विविध साधने ...... करमणूक का लागते ...... कोण कोणते प्रकार ..... शारीरिक, मानसिक थकवा ....... साधने बंद तर काम अशक्य ...... हास्य हा स्थायी भाव ...... तणाव विसरणे अशक्य ...... कलाकारास जन्म नाही ..... स्थान नाही ..... संस्कृतिवर्धन नाही.

ⓘ ⓘ ⓘ